Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

**[4202]-101**

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 01**

**(व्यावहारिक व उपयोजित मराठी—भाग-01)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

(*iii*) **सर्व** उपप्रश्नांना समान गुण आहेत.

1. मराठीतील शुद्धलेखनविषयक नियम सविस्तर लिहून त्यांची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा लेखनविषयक नियमानुसार दुरुस्त करून लिहा :

"झाडे आपल्या बागा आणी दीबाणखानेच सूशोभीत करत नाहित तर आपलि मनेहि सुशोभीत करतात झाडे आपणास प्रानवायु देतात असे वीज्ञान सांगते त्यामूळे शरिराला जसे चैतन्य मीळते तसे मनालाहि मिळते माणसाच्या मणाला शितलता प्रसन्नता आनंद झाडे देतात झाडांच्या दर्शनामूळे आपणे मण चैतन्याने फूलुन येत वृक्षवल्ली आम्हां सोयरि वणचरे या तुकारामांच्या उद्‌गारात केवढा अर्थ भरलेला आहे हे झाडांजवळ गेल्याशीवाय कळणार नाहि खरे म्हणजे आपल्या हालत्या फांद्यांनी आणी सळसळणाऱ्या पाणांनि झाडे मानसाला सतत हाकारत असतात पण आपल्याला ते कळते कूठें"

2. मुद्रित शोधन म्हणजे काय ? ते सांगून मुद्रितशोधनाचे महत्त्व स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा आपल्या उत्तरपत्रिकेत जसाच्या तसा लिहून त्याचे खुणांच्या साहाय्याने मुद्रितशोधन करा :

"................

निळें सरोवर

दलसरोवराच्या या स्वच्छ आणि निळ्या पाण्यावरलिलीची व कमळाचि फूले फूललेलि असतात तेव्हाचि शोभा शब्दांनि वर्णन करता येत नाहि खरोखर काश्मिरांतील हे नीळे सरोवर म्हणजे सुंदर

काश्मिरातील अतिरम्य स्थळ आहे अनेक हौशी पर्यटक यास्थळा ला नियमित पणे भेटदेतात आणिआनंदीत होतात

आपले आप्तेष्टमित्रमैत्रिणीना यास्य ळाचि महतिसांग तात"

3. एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादन करताना कोणकोणत्या घटकांचा विचार करावा लागतो ते सविस्तर लिहा.

**किंवा**

पुस्तक प्रकाशन प्रक्रियेतील वेगवेगळ्या टप्प्यांचा परिचय करून द्या.

4. मुलाखत म्हणजे काय ? ते सांगून मुलाखतीचे विविध प्रकार कोणते ते सविस्तर लिहा.

**किंवा**

अर्जाचे स्वरूप सांगून अर्जाचे विविध प्रकार कोणते ते सोदाहरण लिहा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) स्मरणिका

(2) पत्रलेखनाचे प्रकार

(3) ग्रंथाची प्रस्तावना

(4) दूरदर्शन माध्यमातील जाहिरातीची संहिता.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-102

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 02**

**अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1818-1920)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 1818 ते 1874 या कालखंडातील वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा स्पष्ट करा.

**किंवा**

'1818 ते 1874 या कालखंडातील साहित्याचे स्वरूप भाषांतराचे व प्रयोजन ज्ञानप्रसाराचे होते.' विधानाचा परामर्श घ्या.

2. 'अव्वल इंग्रजी कालखंडातील नियतकालिके समाजप्रबोधनासाठी निर्माण झाली.' ऐतिहासिक आढावा घ्या.

**किंवा**

महात्मा जोतिबा फुले यांच्या समग्र वाङ्मयावर टिपण लिहा.

3. पहिले वास्तववादी कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

श्री अण्णासाहेब किर्लोस्कर हे कृ.प्र. खाडिलकर यांच्या संगीत नाटकांचे विशेष व स्वरूप स्पष्ट करा.

4. 'कविवर्य केशवसुतांनी मराठी कवितेत क्रान्ती घडविली.' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

1875–1920 या कालखंडातील कथासाहित्याचे मूल्यमापन करा.

5. टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(1) लोकहितवादींची शतपत्रे

(2) 'यमुनापर्यटन' कादंबरी

(3) 'संगीत शारदा' नाटक

(4) बालकवींची निसर्गकविता.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-103

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2012

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र.-3

### भाषाविज्ञान : वर्णनात्मक

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वर्णनात्मक आणि ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतींचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा म्हणजे काय ते सांगून, उच्चारण आणि लेखन यातील भेद स्पष्ट करा.

**2.** स्वन, स्वनिम आणि स्वनांतर या संकल्पना विशद करा.

**किंवा**

भाषाविज्ञान आणि मानसशास्त्र म्हणजे मनोभाषाविज्ञान या अभ्यासकक्षेचा थोडक्यात परिचय करून द्या.

**3.** पदांची घटना म्हणजे काय ? ते सांगून, स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

अर्थक्षेत्र आणि घटक विश्लेषण या दोन्ही संकल्पना सोदाहरण लिहा.

**4.** प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पद्धतीचे स्वरूप सोदाहरण विशद करा.

**किंवा**

वाक्यविश्लेषण संकल्पना स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(*i*) भाषा आणि भाषण भेद

(*ii*) रूपिमांचे प्रकार

(*iii*) पूरक विनियोग

(*iv*) निर्देशनपर आणि गुणव्यंजक अर्थ.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-104

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2012

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 04 (ऐच्छिक)

### (2008 PATTERN)

खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी :

(1) ग्रामीण साहित्य.

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पाश्र्वभूमी (प्रारंभ ते 1818).

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास.

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या.

**किंवा**

(5) अलंकार व छंद.

### (1) ग्रामीण साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. ग्रामीण साहित्याची संकल्पना स्पष्ट करून निर्मितीची कारणे लिहा.

**किंवा**

'महात्मा फुले हे ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्थान आहेत.' या विधानाची चर्चा करा.

2. बदलत्या गावगाड्याचे चित्रण ग्रामीण साहित्याने कसे केले आहे ते स्पष्ट करा.

**किंवा**

स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यातील कुटूंब व जातीव्यवस्थेतील परिवर्तनाचे चित्रण स्पष्ट करा.

3. ग्रामीण साहित्य आणि सामाजिक-सांस्कृतिक चळवळीचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

'ग्रामीण बोली हे ग्रामीण साहित्याचे बलस्थान आहे.' या विधानाची चर्चा करा.

4. 'ग्रामजीवनाचे प्रतिबिंब ग्रामीण कादंबरीतून दिसते.' साधार विवेचन करा.

**किंवा**

आनंद यादव यांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घ्या.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) ग्रामीण साहित्याचे योगदान

(2) ग्रामीण साहित्यावरील आक्षेप

(3) ग्रामीण कवितेतील निसर्ग

(4) शंकर पाटलांचे कथालेखन.

**(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'साहित्यातील विविध वाङ्मयप्रवाह संबंधित संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करतात.' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

'साहित्य-संस्कृतीचे ज्ञान साहित्याचा आकलनाला पूरक ठरते.' साधार स्पष्ट करा.

2. 'संतवाङ्मय हा मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा मुख्य प्रवाह (Main Stream) होय.' या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

'शाहिरी वाङ्मयातून पेशवेकालीन महाराष्ट्राचे दर्शन घडते.' सोदाहरण सांगा.

3. 'पंडिती वाङ्मय-परंपरेने मराठी साहित्यात मोलाची भर घातली.' हे विधान साधार स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्य व मध्ययुगीन मराठी वाङ्मय यातील अंतरंग-संबंध सांगा.

**4.** बखर वाङ्मयाच्या प्रेरणा व स्वरूप विशद करा.

**किंवा**

'गुरुचरित्र', 'उखाहरण', 'ख्रिस्तपुराण' या ग्रंथांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) श्रीगोविंदप्रभू चरित्र

(2) व्यवहारविज्ञान कोश : दासबोध

(3) दमयंती स्वयंवर

(4) मोरोपंतांचे आर्याभारत.

# [4202]-104

## (3) तौलनिक साहित्याभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. तौलनिक साहित्याभ्यासाचे उद्दिष्ट व स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या एकभाषिक अभ्यासातील उणिवांचा परामर्श घेऊन तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्व विशद करा.

2. वाङ्मयीन प्रभावाची (Literary Influence) संकल्पना सोदाहरण लिहा.

**किंवा**

राष्ट्रीय साहित्य म्हणजे काय ? ते सांगून तौलनिक साहित्याभ्यासातील त्याचे महत्त्व विशद करा.

3. विश्व साहित्याची संकल्पना तौलनिक साहित्याभ्यासासाठी कशी उपयुक्त ठरते ते साधार लिहा.

**किंवा**

"आपल्या राष्ट्रीय साहित्याखेरीज इतर राष्ट्रांमधील साहित्यिक परंपरांचे ज्ञान आपल्याला असले पाहिजे." या गटेच्या मताचा परामर्श घ्या.

4. मर्ढेकर व काझी सलीम यांच्या काव्यातील साम्यभेदांचे विवेचन करा.

**किंवा**

मर्ढेकर व सलीम काझी यांच्या काव्यातील प्रतिमा विश्वाचा परिचय करून द्या.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) तुलनेचे फायदे

(2) 'प्रभव' संकल्पना

(3) मर्ढेकर व सलीम काझी यांच्या काव्यातील जीवनविषयक दृष्टिकोन

(4) मर्ढेकर व काझी सलीम यांच्या काव्यातील नवता.

# [4202]-104

## (4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. इतिहास म्हणजे काय ते सांगून ऐतिहासिक स्थित्यंतराचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास म्हणजे काय ते सांगून वाङ्मयेतिहासाचा संशोधन आणि टीकाशास्त्राशी असलेला अनुबंध स्पष्ट करा.

2. वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेच्या उदयाची पाश्चात्यांच्या दृष्टीकोनातून मीमांसा करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास संकल्पनेविषयी भारतीयांचा विचार थोडक्यात सांगा.

3. वाङ्मयेतिहास लेखनाचे स्वरूपावरून कोणकोणते प्रकार पडतात ते सांगा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास लेखनाचे लेखनरीतीवरून कोणते प्रकार होतात ते लिहा.

4. वाङ्मयेतिहासातील नवसंकल्पनांचा थोडक्यात मागोवा घ्या.

**किंवा**

'वाङ्मयेतिहासातील नवसंकल्पनांनी वाङ्मयेतिहास लेखनाला नवी दिशा दिली.' चर्चा करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) गणेशदेवी यांच्या दृष्टीतील वाङ्मयेतिहास संकल्पना

(2) वाङ्मयप्रकारलक्ष्यी वाङ्मयेतिहास

(3) समग्रलक्ष्मी वाङ्मयेतिहास

(4) वाङ्मयेतिहास लेखनाची ध्येये व उद्दीष्टे.

## (5) अलंकार व छंद

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'काव्यं ग्राह्यमलंकारात सौंदर्यमलंकार' या संकल्पनेचा सोदाहरण विचार स्पष्ट करा.

**किंवा**

काव्यालंकाराचे प्रकार सांगून त्यांचे व्याकरणातील स्थान सिद्ध करा.

2. प्राचीन मराठी कवितेच्या छंदोरचनेचा थोडक्यात परामर्श घ्या.

**किंवा**

छंद आणि वृत्त यांचे कवितेतील योगदान स्पष्ट करा.

3. काव्ययुग ही संकल्पना सांगून गुण आणि छंद यांच्यातील परस्परसंबंधाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

'काव्यवचने अंतर्गत सौंदर्यतत्त्व निर्माण करण्याचे कार्य अलंकरणातून साक्षात होते.' या विधानाची सत्यता लिहा.

4. मुक्तछंदाचे स्वरूप सांगून त्याचे काव्यातील महत्त्व उदाहरणासह स्पष्ट करा.

**किंवा**

अपन्हुती, उपमा, वक्रोक्ती आणि रूपक या अलंकारांचा सोदाहरण परिचय करून द्या.

5. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(1) मुक्तछंद

(2) औचित्य : एक काव्यगुण

(3) भामहाचे अलंकार विश्लेषण

(4) अलंकारविषयक मराठीतील चिंतन.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-201

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 9**

**(व्यावहारिक व उपयोजित मराठी, भाग-2)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण अहेत.

**1.** भाषांतराचे स्वरूप सांगून त्याची आवश्यकता व महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

"Success is not in the achievement but in the achieving. Some people never try because they are afraid to lose. At the same time, they don't want to stay where they are because they are afraid to be left behind. There is a risk either way. Ships that go out into the open water face risk from a storm. But if they sit in the harbour, they would rust and that is not what they were built for. That is the difference between playing to win and play not to lose. One cannot be committed and not take risks. People who play to win thrive on pressure and those who play not to lose don't know how to succeed."

**2.** भाषांतर, रूपांतर व अनुवाद यातील साम्यभेद स्पष्ट करा.

**किंवा**

जनसंपर्काचे स्वरूप सांगून त्याची आवश्यकता स्पष्ट करा.

3. ‘माध्यम बदलते की निवेदन बदलते’ या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

**किंवा**

निवेदनाचे स्वरूप, आवश्यकता आणि तंत्राचा परिचय करून द्या.

4. जनसंपर्काचे स्वरूप स्पष्ट करून जनसंपर्काची आवश्यकता सविस्तर लिहा.

**किंवा**

जनसंपर्क अधिकाऱ्याकडे कोणती गुणवैशिष्ट्ये असणे गरजेचे आहे ? त्याचा उपयोग कसा केला जातो ते सोदाहरण स्पष्ट करा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(*i*) महाविद्यालयातील कलामंडळ उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

(*ii*) जनसंपर्काची तंत्रे

(*iii*) निवेदनाचे शैली

(*iv*) रेडियो मिरची वरील निवेदन.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-202

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 2**

**अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. 1920 ते 1960)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 1920 ते 1960 या कालखंडातील वाङ्मयीन निर्मितीच्या प्रेरणा स्पष्ट करा.

**किंवा**

'दिवाकर कृष्णांच्या कथासाहित्याने मराठी लघुकथेला एक नवे वळण मिळाले.' या विधानाची साधार चर्चा करा.

2. 'आचार्य अत्रे यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीला नवचैतन्य आणले.' कसे ते लिहा.

**किंवा**

1920 ते 1960 या कालखंडातील प्रमुख कादंबरीकारांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

3. 1920 ते 1960 या कालखंडातील चरित्र-आत्मचरित्रांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

नवकवितेचे स्वरूप स्पष्ट करून, तिचे वेगळेपण लिहा.

4. '1920 ते 1960 या कालखंडात सामाजिक, राजकीय वातावरण लघु-निबंधाला पोषक होते' कसे ते स्पष्ट करा.

**किंवा**

1920 ते 1960 या कालखंडातील समीक्षा व्यवहाराचे स्वरूप स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) ना. सी. फडके लघुनिबंधकार

(2) समीक्षक वि. स. खांडेकर

(3) स्मृतिचित्रे

(4) रणांगण कादंबरी.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-203

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 3**

**भाषाविज्ञान : सामाजिक**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप साधार लिहा.

**किंवा**

'समाजभाषाविज्ञान ही शाखा भाषाविज्ञानाची व्याप्ती वाढविणारी आहे.' या विधानाचा परामर्श घ्या.

2. विविध सामाजिक परंपरेनुसार निर्माण होणारे भाषाभेद स्पष्ट करा.

**किंवा**

वर्गव्यवस्थेनुसार बदलणारे भाषेचे स्वरूप साधार लिहा.

3. लिंगभेदानुसार होणारे भाषाभेद सोदाहरण विशद करा.

**किंवा**

प्रमाणभाषा आणि परभाषासंपर्क परस्परसंबंध स्पष्ट करा.

4. औद्योगिक आणि सांस्कृतिक नवव्यवस्थेचा भाषेवरील प्रभाव स्पष्ट करा.

**किंवा**

'भाषा व्यवसायानुसार बदलते.' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत

(2) पिजिन व क्रिऑल भाषा

(3) बालभाषा

(4) संदेशनाची नवी भाषा : ई-भाषा.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8**

| Seat No. | |
|---|---|

**[4202]-204**

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-4**

**(ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) दलित साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहास लेखनविधा (भाग-2)

**किंवा**

(5) व्याकरण

## (1) दलित साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'दलित साहित्याने मराठी साहित्यास समृद्ध केले.' या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

'मानवी मूल्यांचे भान, विज्ञाननिष्ठा व आधुनिकता ही दलित साहित्याची वैशिष्ट्ये आहेत.' स्पष्ट करा.

2. 'दलित साहित्य एका आवर्तात सापडले आहे.' या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

दलित रंगभूमीची वाटचाल स्पष्ट करा.

3. दलित साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणांचा आढावा घ्या.

**किंवा**

दलित साहित्यातील स्त्रियांच्या आत्मकथनांचे स्वरूप स्पष्ट करा.

4. दलित कथेतून दलित समाजजीवनाचे दर्शन घडते. सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

दलित साहित्याच्या समीक्षेची वाटचाल स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) आठवणींचे पक्षी

(2) दलित साहित्याच्या भाषेचे स्वरूप

(3) बाबुराव बागूल यांची कथा

(4) दलित साहित्य व जागतिकीकरण.

किंवा

**(2) मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'ज्ञानप्रसार' हे अव्वल इंग्रजी कालखंडातील साहित्याचे प्रयोजन होते.' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

'मराठी वृत्तपत्रीय वाङ्‌मयाने आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जाणीवा समृद्ध केल्या.' सोदाहरण सांगा.

2. 'महाराष्ट्रातील धार्मिक-सांस्कृतिक संक्रमणामध्ये मिशनरी मंडळींचा मोठा वाटा आहे.' साधक-बाधक चर्चा करा.

**किंवा**

'व्यक्तिवादाचा प्रभाव 1930 नंतरच्या नाट्यवाङ्‌मयावर जाणवतो.' साधार स्पष्ट करा.

3. 'म. फुले यांच्या साहित्याने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर परिणाम केला.' या मताचा परामर्श घ्या.

**किंवा**

महायुद्धांनंतर उद्‌भवलेल्या सामाजिक, सांस्कृतिक बदलाचे चित्रण कवितेतून कसे दिसून येते ?

4. ‘स्त्रीजीवनातील स्थित्यंतराचे दर्शन आधुनिक मराठी कादंबरीतून घडते.’ चर्चा करा.

**किंवा**

‘नवकथेमधून बदलत्या समाज-संस्कृतीचे दर्शन घडते.’ सोदाहरण सांगा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) शेतकऱ्यांचा आसूड

(2) यमुना पर्यटन

(3) शतपत्रे—लोकहितवादी

(4) ताराबाई शिंदे यांची ‘स्त्री-पुरुष तुलना’.

किंवा

## (3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भाषांतर म्हणजे काय ते सांगून मूलनिष्ठ व लक्ष्यनिष्ठ भाषांतराचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

भाषांतर, अनुवाद व रूपांतर या संकल्पनांमधील भेद स्पष्ट करा.

2. मराठी साहित्याच्या विकासास अनुवादाने वेळोवेळी कसे सहाय्य केले आहे ते लिहा.

**किंवा**

मराठीतील भाषांतरित कादंबऱ्यांचा आढावा घ्या.

3. 'हवेली वेव्हरलेंची' व 'तुंबाडचे खोत' या कादंबऱ्यातील पात्रचित्रणाची वैशिष्ट्ये विशद करा.

**किंवा**

'हवेली वेव्हरलेची' व 'तुंबाडचे खोत' या कादंबऱ्यातील जीवनविषयक दृष्टिकोनाचे स्वरूप स्पष्ट करा.

4. 'तुंबाडचे खोत' या कादंबरीचे एक प्रादेशिक कादंबरी म्हणून मूल्यमापन करा.

**किंवा**

'हवेली वेव्हरलेची' व 'तुंबाडचे खोत' या कादंबऱ्यातील स्त्रीपात्रांचा परिचय करून द्या.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) मूलनिष्ठ भाषांतर

(2) भाषांतराची आवश्यकता

(3) 'हवेली वेव्हरलेंची' मधील रहस्यमयता

(4) हवेलीतील रॉबिन व 'तुंबाडचे खोत' मधील खोत.

किंवा

(4) वाङ्मयेतिहास लेखनविधा (भाग-2)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. बहुभाषिक राष्ट्रातील वाङ्मयेतिहासाच्या स्वरूपाचा थोडक्यात परिचय करून द्या.

**किंवा**

मराठी वाङ्मयाचा भारतक्षेत्रीय अभ्यास कसा झाला ते सांगा.

2. मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासातील समस्या व अडचणींची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

आधुनिक मराठी वाङ्मयेतिहास लेखन करताना येणाऱ्या समस्या व अडचणींचा ऊहापोह करा.

3. वि. ल. भावे ते म. सा. प. प्रकल्पांतर्गत झालेल्या मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचे समालोचन करा.

**किंवा**

मराठी वाङ्मयाचे इंग्रजी व हिंदी भाषेतील वाङ्मयेतिहास लेखन कसे झाले ते सांगा.

4. 1947 पर्यंत झालेल्या मराठी वाङ्मयेतिहासाचा विचार स्पष्ट करा.

**किंवा**

रा. श्री. जोग, शं. गो. तुळपुळे आणि म. ना. अदवंत यांनी केलेल्या वाङ्मयेतिहास लेखन कार्याची माहिती लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) वाङ्मयेतिहास लेखनातील तात्त्विक अडचणी

(2) ल. रा. पांगारकर यांचे वाङ्मयेतिहास लेखन कार्य

(3) माटे-बेडेकर वाद

(4) स. गं. मालशे यांचे वाङ्मयेतिहासविषयक लेखन.

किंवा

(5) व्याकरण

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. व्याकरण आणि भाषा यांच्यातील अन्योन्यसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

व्याकरणाच्या विविध व्याख्या देऊन व्याकरणाचे महत्त्व सिद्ध करा.

2. व्याकरणाचे विविध प्रकार सांगा.

**किंवा**

आदेशात्मक व्याकरण आणि वर्णनात्मक व्याकरण या व्याकरणाच्या प्रकारांचा सोदाहरण परामर्श घ्या.

3. मराठीतील व्याकरणविषयक विचारांचा सविस्तर आढावा घ्या.

**किंवा**

मराठी व्याकरणाविषयी कोणते वादविवाद आहेत, ते लिहा.

4. व्याकरणातील शब्द आणि वर्ण विचारांचा सविस्तर परिचय करून द्या.

**किंवा**

'वाक्य ही सर्वात मोठी व्याकरणीक रचना आहे.' सविस्तर लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) तुलनात्मक व्याकरण

(2) ऐतिहासिक व्याकरण

(3) शब्द आणि वर्ण यातील भेद

(4) अर्जुनवाडकर यांचा व्याकरणविचार.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-301

## M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2012

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र. 5

## (प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार)

## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. वृत्तपत्रमाध्यमाची स्वरूप आणि वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

फीचर-रायटिंग म्हणजे काय ते सांगून त्याची वैशिष्ट्ये विशद करा.

2. कलेची व्याख्या सांगून विविध कलांचे परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

तुम्हास आवडलेल्या चित्रपटाचे वृत्तपत्रासाठी आस्वादात्मक लेखन करा.

3. पुस्तकपरीक्षण कोणकोणत्या घटकांच्या आधारे केले जाते, ते लिहा.

**किंवा**

मराठीमध्ये साहित्य अकादमी विजेत्या एका लेखकाचा परिचय करून द्या.

P.T.O.

4. वृत्तपत्र आणि दृक्‌श्राव्यमाध्यमासाठीची लेखनसंहिता यांच्यातील फरक साधार स्पष्ट करा.

**किंवा**

तुमच्या गावात झालेल्या कविसंमेलनाचे वृत्त दूरदर्शनसाठी लिहा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) क्रीडापत्रकारिता

(2) चित्राचा रसास्वाद

(3) बालकथालेखक

(4) संगीत समीक्षेचे घटक.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

**[4202]-302**

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 06**

**(साहित्य समीक्षा आणि संशोधन)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. समीक्षेची प्रयोजने कोणकोणती आहेत ते सांगून परिचय विश्लेषण व स्पष्टीकरणात्मक टिपण या प्रयोजनांचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

'समीक्षा ही लेखकाला मार्गदर्शक ठरते' या विधानाचा परामर्श घ्या.

2. आदर्श समीक्षकाची साधना ही संकल्पना सविस्तर विशद करा.

**किंवा**

समीक्षेत समीक्षकाने मांडणी व शैली यांचे तारतम्य, संगती व सुसुत्रता याचे भान कसे सांभाळावे ते लिहा.

3. रूपवादी समीक्षापद्धतीच्या मर्यादा व सामर्थ्य लिहा.

**किंवा**

ऐतिहासिक समीक्षापद्धतीच्या सामर्थ्य व मर्यादा लिहा.

4. 1974 ते 1920 या कालखंडातील समीक्षा पद्धती पाश्चात्यांच्या निकषांभोवती कशी फिरते ते लिहा.

**किंवा**

1960 ते 1975 या कालखंडातील मराठी समीक्षकांचे कार्य विशद करा.

5. टिपा लिहा (फक्त 2) :

(1) समीक्षकाची आवश्यकता

(2) समीक्षकाचा नेमकेपणा व तार्किकता

(3) आदिबंधात्मक समीक्षापद्धती

(4) न.चि. केळकरांची सविकल्प समाधीची संकल्पना.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-303

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-07**

**(विशेष लेखकाचा अभ्यास) (प्राचीन/अर्वाचीन)**

**प्राचीन : संत तुकाराम**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामांच्या चरित्रात्मक अभंगाद्वारे त्यांच्या जीवनाच्या जडणघडणीचा आढावा घ्या.

**किंवा**

'संत तुकारामांचे अभंग म्हणजे व्यावहारिक आणि पारमार्थिक आत्मचरित्र होय.' या विधानाचा परामर्श घ्या.

**2.** 'आंतरिक तळमळ, भावार्तता व उत्कटता हे तुकारामांच्या साधकावस्थेचे विशेष आहेत.' स्पष्ट करा.

**किंवा**

'हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥' या अभंगाद्वारे संत तुकारामांच्या साधकावस्थेतील ईश्वरभेटीचा हेतू समजावून सांगा.

**3.** आचारभ्रष्ट समाज व विषमसमाज स्थितीचे दर्शन तुकारामांच्या अभंगात कसे प्रतिबिंबित झाले आहे ? ते लिहा.

**किंवा**

'ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनि म्हणती साधू॥' या अभंगाच्या आधारे संत तुकारामांची धर्मविषयक संकल्पना स्पष्ट करा.

**4.** 'तुका झालासे कळस' या अभंगाच्या आधारे तुकारामांच्या कार्याचे मोठेपण सांगा.

**किंवा**

समकालीन संतांपेक्षा संत तुकारामांचे वेगळेपण पटवून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) पंढरीची वारी, आहे माझे घरी' अभंगाचा भावार्थ

(ब) संत तुकारामांचे समाज प्रबोधन

(क) संत तुकारामांचे धर्मचिंतन

(ड) 'जे का रंजले गांजले'चे विचारसूत्र.

(विशेष लेखकाचा अभ्यास) (प्राचीन/अर्वाचीन)

अर्वाचीन : प्रा. द. ता. भोसले

वेळ : तीन तास एकूण गुण : 80

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'प्रा. द. ता. भोसले हे ग्रामीण जीवनाशी समरस झालेले लेखक आहेत.' कसे ते साधार लिहा.

**किंवा**

'ग्रामीण जीवनाची अनुभूती हा प्रा. द. ता भोसले यांच्या कथा लेखनाचा स्थायीभाव आहे.' या विधानाची चर्चा करा.

**2.** व्यक्ति आणि समाज जीवनाचे उत्कट प्रतिबिंब प्रा. द. ता. भोसले यांच्या 'जन्म' आणि 'पाऊस' या कथासंग्रहातून कसे व्यक्त झाले आहे, ते सांगा.

**किंवा**

'अगं अगं म्हशी' व 'मनस्विनी' या प्रा. द. ता. भोसले यांच्या कथासंग्रहातून प्रादेशिक जीवन त्यातील गुणवैशिष्ट्यांसह उलगडून दाखवा.

**3.** प्रा. द. ता. भोसले यांच्या कादंबरीलेखनाचे मूल्यमापन करा.

**किंवा**

'मी आणि माझा बाप' या कादंबरीतील ग्रामीण जीवनाचे अंतरंग विशद करा.

**4.** प्रा. द. ता. भोसले यांच्या 'पार आणि शिवार' या ललित गद्य लेखनातील भाषिक वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

'परिघावरची माणसं' या ललित गद्यलेखनातील व्यक्तिरेखांचा परामर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) 'पाळव'—कथासंग्रहाची लेखन शैली

(ब) 'जन्म' कथासंग्रहातील वातावरण

(क) 'पार आणि शिवार' ची समर्पकता

(ड) 'बाळमुठीतील दिवस'—ललित गद्यलेखनाचे अंतरंग.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8+2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-304

## M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2012

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक 8 (ऐच्छिक)

### (2008 PATTERN)

**विशेष सूचना :—खालील प्रश्नपत्रिकांपैकी कोणतीही *एक* प्रश्नपत्रिका सोडवावी.**

(1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

**किंवा**

(2) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(3) लेखनविद्या व निबंध लेखन

**किंवा**

(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

### (1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** लोकसाहित्यातील 'लोक', 'साहित्य' आणि लोकजीवन यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या सामाजिक व सांस्कृतिक अनुबंधाची चर्चा करा.

**2.** लोकसाहित्यातील त्यातील विविध संप्रदायांबद्दल लिहा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासाची भारतीय परंपरा स्पष्ट करा.

**3.** लोकसाहित्य, संतसाहित्य आणि आधुनिक साहित्य यांच्यातील संबंधाचे विश्लेषण करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या सादरीकरणातून व्यक्त होणाऱ्या लोकतत्त्वाचे विशेष सांगा.

**4.** लोकसाहित्याच्या संकलनातील विविध पद्धती कोणत्या ते लिहा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासकाने पाळावयाची पथ्ये सोदाहरण स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लोककला

(आ) लोकसाहित्य आणि धर्म

(इ) लोकसाहित्याचे प्रादेशिक विशेष

(ई) म्हणीतील लोकसंकेत.

# [4202]-304

## (2) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'सौंदर्यशास्त्र ही विज्ञान आणि मनोविज्ञानाचीच एक उपशाखा आहे.' असे तुम्हास वाटते का ? साधार लिहा.

**किंवा**

सापेक्षतावादाचा सौंदर्यशास्त्रीय निकषांवर काय परिणाम होतो, ते स्पष्ट करा.

**2.** सौंदर्यशास्त्रातील द्विध्रुवात्मकता साधार स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यविधान आणि नीतिविधान यांच्यातील साम्यभेद स्पष्ट करा.

**3.** हर्बर्ट स्पेन्सरचा क्रीडा सिद्धांत स्पष्ट करा.

**किंवा**

सहअनुभूतीचा सिद्धान्त उलगडून सांगा.

**4.** सौंदर्यानुभवातील ज्ञानशक्तीचे मुक्तमेलन स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यानुभवातील स्वायत्तता आणि विविधता स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) समीक्षेतील प्रमाणबद्धता आणि सौंदर्यशास्त्र

(2) कांटची अनन्यसाधारणत्त्वाची संकल्पना

(3) सुखवादाचा सिद्धान्त

(4) सौंदर्यानुभवातील तटस्थता.

## (3) लेखनविद्या व निबंधलेखन (ऐच्छिक)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'मानवी जीवन हे भाषिक व्यवहारावरच सर्वस्वी अवलंबून असते.' चर्चा करा.

**किंवा**

"'संवाद' प्रक्रिया विविध माध्यमानुसार बदलते." कशी ते लिहा.

**2.** संवादविषयक सिद्धांताचा सविस्तर परिचय करून द्या.

**किंवा**

संवाद प्रक्रियेतील घटकांची ओळख करून द्या.

**3.** अर्थ म्हणजे काय ते सांगून अर्थनिर्मिती प्रक्रिया सोदाहरण उलगडून दाखवा.

**किंवा**

अर्थनिश्चिती मागील निकषांचे सोदाहरण विवेचन करा.

**4.** सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील संवाद व्यवहाराचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

रेडिओ जॉकीचे 'संवादकौशल्य' उदाहरणासह लिहा.

**5.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(1) भाषा : चिन्हव्यवस्था

(2) संवादातील अडथळे

(3) प्रशासकीय परिभाषा

(4) संवाद आणि आधुनिक प्रसारमाध्यमे.

# [4202]-304

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ललित साहित्य आणि वैचारिक साहित्य यांच्यातील साम्यभेदाची चर्चा करा.

**किंवा**

'निबंध वाङ्मयाचे मराठी भाषेच्या समृद्धीत भर पडली.' चर्चा करा.

**2.** महात्मा फुले यांच्या समाजप्रबोधनपर विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

19व्या शतकातील निबंधवाङ्मयातील वैचारिक अधिष्ठान स्पष्ट करा.

**3.** मराठी निबंध वाङ्मयातील राष्ट्रवादी विचारांची चर्चा करा.

**किंवा**

लोकहितवादी यांच्या सामाजिक विचारांची चर्चा त्यांच्या 'शतपत्रां'च्या आधारे करा.

**4.** न्यायमूर्ती रानडे, आगरकर यांच्या धर्मसुधारकविषयक विचारांचे समालोचन करा.

**किंवा**

विठ्ठल रामजी शिंदे आणि गं. बा. सरदार यांच्या विचारशैलीची तुलना करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) विष्णुशास्त्री चिपळूणकरांची लेखनशैली

(2) शि. म. परांजपे यांची वक्रोक्ती

(3) सावरकरांचे विज्ञान लेखन

(4) पु.ग. सहस्त्रबुद्धे यांच्या लेखनातील सामाजिकता.

# [4202]-304

## (5) साहित्य : सर्जन आणि उपयोजन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेसंबंधी पाश्चात्य मीमांसकांची मते विशद करा.

**किंवा**

वामनाच्या रीतीविचाराचे स्वरूप उलगडून दाखवा.

**2.** सर्जनशीलतेमुळे साहित्यप्रकाराला वेगळेपण प्राप्त होते. कसे ते उदाहरणासह स्पष्ट करा.

**किंवा**

सर्जनशीलतेमुळे 'कथा' या प्रकाराचे विविध वाङ्‌मयप्रकार कसे निर्माण झाले ते लिहा.

**3.** निर्मितीप्रक्रियेतील समस्या विशद करा.

**किंवा**

नाटकाची संहिता ते प्रयोग—या वाटचालीत सर्जनशीलता कशी कार्यरत होते ते उदाहरणांसह लिहा.

**4.** साहित्यनिर्मितीत 'बोलविता धनी वेगळाच' असतो काय याचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

'लेखकाचा व्यासंग' याविषयी सविस्तर विवेचन करा.

**5.** कोणत्याही **दोन**वर टीपा लिहा :

(1) भावयित्री आणि कारयित्री प्रतिभा

(2) मिथकाची निर्मिती

(3) रीतीचे महत्त्व

(4) स्वैर निर्मितीचे महत्त्व.

Total No. of Questions—**5**]  [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-401

## M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2012

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र. 5

## (प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार)

## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास**  **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. वृत्तसंकलनाची प्रक्रिया स्पष्ट करून प्रासंगिक कार्यक्रमाच्या वृत्तसंकलनाचा आराखडा तयार करा.

**किंवा**

तुमच्या गावात साजरा केलेल्या गणेशोत्सवाचे वृत्त संकलन करा.

2. आकाशवाणीवर जाहिरातलेखनासाठी आवश्यक असणाऱ्या विविध घटकांची उदाहरणे देऊन चर्चा करा.

**किंवा**

दृक्श्राव्य माध्यमासाठी जाहिरात तयार करण्याची वैशिष्ट्ये सांगून बाळकामगार विरोधी जनमत तयार करण्यासाठी जाहिरात लिहा.

3. ‘चित्रपटाहून आकाशवाणी आणि दूरदर्शन यासाठी वेगळ्या रितीने पटकथा लिहिली जाते’ सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

‘पटकथा लिहिताना माध्यमांचा विचार अपरिहार्य ठरतो.’ सोदाहरण चर्चा करा.

4. कथेतून पटकथेत रूपांतर करताना त्यात कोणते बदल होतात ?

**किंवा**

कादंबरी आणि पटकथा या साहित्यप्रकारातील साम्यभेद सोदाहरण सांगा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) नाटकाचे वृत्तसंकलन

(2) मुद्रित माध्यमासाठी जाहिरातलेखन

(3) पटकथालेखनाची वैशिष्ट्ये

(4) रूपांतरकौशल्य.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

**[4202]-402**

**M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 6**

**(साहित्य समीक्षा व संशोधन)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संशोधकाच्या असणाऱ्या गुणविशेषांचा परिचय करून द्या.

**किंवा**

संशोधनाच्या प्रयोजनांनुसार संशोधनांचे स्वरूप कसे बदलते ते सोदाहरण लिहा.

2. तौलनिक संशोधन पद्धतीचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

वाङ्मयीन संशोधनातील विविध अभ्यासक्षेत्रांचा आढावा घ्या.

3. आंतरविद्या क्षेत्रीय संशोधन म्हणजे काय ते सांगून त्याचे सोदाहरण स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

संशोधनाचा मानसशास्त्राशी असणारा अनुबंध उलगडून दाखवा.

4. लोकसाहित्याचे संशोधन पुरेसे झाले आहे काय ? आढावा घ्या.

**किंवा**

शं. गो. तुळपुळे आणि वि.भि. कोलते यांच्या महानुभाव संशोधन कार्याचा परिचय करून द्या.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) सूची वाङ्मय

(आ) वाङ्मयेतिहाससंबंधी संशोधन

(इ) साहित्य आणि तत्त्वज्ञान

(ई) सु. म. कत्रे यांचे भाषाविषयक संशोधन.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| Seat No. | |
|---|---|

# [4202]-403

**M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 07**

**(विशेष लेखकाचा अभ्यास — प्राचीन/अर्वाचीन)**

**(प्राचीन — संत तुकाराम)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संत तुकारामांच्या अभंगांचे सामर्थ्य त्यांच्या काव्यरचनेतून कसे स्पष्ट होते ? ते साधार लिहा.

**किंवा**

संत तुकारामांची काव्यदृष्टी व अभंगसृष्टी यांची एकरूपता स्पष्ट करा.

2. संत तुकारामांच्या भाषारचनेची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

**किंवा**

एक लोककवी म्हणून तुकारामांच्या अभंगांचे सामर्थ्य सांगा.

3. संत तुकारामांच्या अभंगातील लोकतत्त्वे अभंगांच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

लोकमाध्यमांचा संत तुकारामांनी कसा उपयोग केला ? साधार लिहा.

**4.** संत तुकारामांच्या अभंगांतील विद्रोहाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'परपीडक तो आम्हा दावेदार' या अभंगाच्या आधारे तुकारामांच्या बंडखोरीचे वेगळेपण विशद करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) संत तुकारामांच्या अभंगातील नादमयता

(2) 'नामसंकीर्तन साधन पै सोपे' अभंगाचा भावार्थ

(3) संत तुकारामांच्या अभंगातील लोकभाषा

(4) संत तुकारामांच्या अभंगातील स्पष्टवक्तेपणा.

# [4202]-403

**(विशेष लेखकाचा अभ्यास — प्राचीन/अर्वाचीन)**

**(अर्वाचीन — डॉ. द. ता. भोसळे)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. प्रा. डॉ. द. ता. भोसळे यांच्या 'ग्रामीण बोली शब्दकोश' या ग्रंथलेखनाची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

प्रा. डॉ. द. ता. भोसळे यांच्या ग्रामीण बोली शब्दकोशाची वैशिष्ट्ये लिहा.

2. डॉ. द. ता. भोसळे यांनी लिहिलेल्या 'लोकोत्तर संत गाडगेबाबा—जीवन व कार्य' या ग्रंथाचे परीक्षण करा.

**किंवा**

एक अद्वितीय चरित्रग्रंथ म्हणून 'लोकोत्तर संत गाडगेबाबा—जीवन व कार्य' या ग्रंथाचे वेगळेपण लिहा.

3. 'लोकसंस्कृती — स्वरूप व विषय' या ग्रंथाच्या आधारे डॉ. द. ता. भोसळे यांचे लेखन विशेष स्पष्ट करा.

**किंवा**

'संस्कृतीच्या पाऊलखुणा' या लेखसंग्रहाचे थोडक्यात वाङ्मयीन मूल्यमापन करा.

**4.** डॉ. द. ता. भोसळे यांचा 'निसर्ग आणि ग्रामीण साहित्य' या ग्रंथलेखनाच्या भूमिकेचे व विचारांचे विवेचन करा.

**किंवा**

डॉ. द. ता. भोसळे यांचा ग्रामीण साहित्यविषयक चिंतनातून व्यक्त झालेल्या विचारांची परामर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) 'चावडीवरचा दिवा' मधील कृषी जीवन दर्शन

(2) कुमारांचे कर्मवीर – भाऊराव पाटील – जीवनकर्तृत्व

(3) डॉ. द. ता. भोसळे – लोकसाहित्याचे अभ्यासक

(4) ग्रामसंस्कृतीचे अनुभवविश्व.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8+2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [4202]-404

**M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2012**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना : खालील प्रश्नांपैकी कोणतीही *एक* प्रश्नपत्रिका सोडवावी.**

(1) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

(2) सौंदर्यशास्त्र

(3) लेखनविद्या व निबंध लेखन

(4) साहित्याचा सामाजिकदृष्टीने अभ्यास

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

**(1) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** लोकसाहित्यातील भलरीगीते व श्रमगीते यांचा सोदाहरण आढावा घ्या.

**किंवा**

लोकगीते आणि संतकवींची कविता यामधील अनुबंध उलगडून दाखवा.

**2.** लोककथांचे उत्पत्ती व स्वरूप विशद करा.

**किंवा**

मराठी लोकनाट्यातील तमाशाचे स्वरूप स्पष्ट करा.

**3.** महाराष्ट्र लोकसंस्कृतीचे उपासक-वासुदेव, गोंधळी यांचा परामर्श घ्या.

**4.** लोकसाहित्याच्या क्षेत्रातील सरोजिनी बाबर आणि गंगाधर मोरजे यांचे योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासात सहाय्य करणाऱ्या 'महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती' पुणे या संस्थेच्या कार्याचा परिचय करून द्या.

**5.** टिपा द्या (कोणत्याही **दोन**) :

(1) कल्पनाबंध

(2) प्राणी कथा

(3) लोकसाहित्यातील कलात्मक सौंदर्य

(4) प्रभाकर मांडे यांचे लोकसाहित्यविषयक कार्य.

# [4202]-404

**(2) सौंदर्यशास्त्र**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** सौंदर्यभावनेमुळेच जीवनाला कलात्मक रूप प्राप्त होते. सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

जीवशास्त्रीय भावना व सौंदर्यभावना यातील भेद विशद करा.

**2.** सेंद्रियएकतेचा रूपविषयक सिद्धान्त विशद करा.

**किंवा**

इतर कला व साहित्य कला यातील साम्यभेद स्पष्ट करा.

**3.** कलेच्या परिणामाच्या संदर्भातील भावनात्मक समधानतेच्या सिद्धान्ताचे विवरण करा.

**किंवा**

विरेचन सिद्धान्त – स्वरूप व मर्यादा लिहा.

**4.** ''साहित्यविचाराच्या चिंतनातून सौंदर्यशास्त्राला निकष मिळतात.'' कसे ते साधार लिहा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र व समीक्षाशास्त्र यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोन**वर टिपा लिहा :

(1) कांटची सौंदर्यमीमांसा

(2) भारतीय रूपविचार

(3) कलेच्या परिणामकारकतेचे निकष

(4) कांटचे सौंदर्यशास्त्र.

# [4202]-404

**(3) लेखनविद्या व निबंध लेखन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवन व्यवहारातील बदलत्या गरजानुसार भाषेचे स्वरूप कसे बदलत जाते, ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा आणि जीवन यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**2.** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे मराठी भाषेपुढे कोणती आव्हाने निर्माण झालेली आहेत ? त्याची मीमांसा करा.

**किंवा**

शिक्षणक्षेत्रातील मराठी भाषेच्या स्थानाची चर्चा करा.

**3.** जाहिरात माध्यमातील मराठी भाषेचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

आधुनिक प्रसारमाध्यमांसाठी लेखन करतांना कोणकोणत्या घटकांची जाणीव असावी लागते, ते सांगा.

**4.** संपादनासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा परिचय करून द्या.

**किंवा**

निबंध म्हणजे काय ते सांगून त्याच्या अभिव्यक्ती विशेषांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) कार्यालयीन मराठी

(ब) जनसंपर्कासाठीची भाषिक कौशल्य

(क) दूरदर्शनावरील बातम्यातील मराठीचे स्वरूप

(ड) निबंध लेखनातील 'मी'.

# [4202]-404

**(4) साहित्याचा सामाजिकदृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याचा सामाजिक अभ्यास म्हणजे काय ते सांगून त्याची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या सामाजिक अभ्यासाचे हेतू स्पष्ट करा.

**2.** लेखकाची जीवनदृष्टी आणि सामाजिक पर्यावरण यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

लेखकावर पडणाऱ्या आर्थिक व सामाजिक घटकांच्या प्रभावाची चर्चा करा.

**3.** वाङ्मयीन अभिरुचीच्या जडणघडणीतील सामाजिक घटकांचे महत्व विशद करा.

**किंवा**

कालतत्व हा घटक साहित्यनिर्मितीला कसा प्रभावित करतो ? त्याची चर्चा करा.

**4.** कलारूपांची स्थलकालसंस्कृती सापेक्षता स्पष्ट करा.

**किंवा**

वाचक प्रतिसाद सिद्धांतामुळे साहित्यकृतीचे आकलन बदलते का, याची साधार चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) नव्या वाङ्मयप्रकारांच्या निर्मितीची कारणे

(ब) वाङ्मयीन शैली व तंत्रविचाराची सामाजिक पार्श्वभूमी

(क) सामाजिक चळवळी व मराठी साहित्य

(ड) कलामूल्यांची जीवनसापेक्षता.

# [4202]-404

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्य निर्मितीप्रक्रियेतील कल्पना, स्मरणशक्ती यांचे महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

'साहित्यनिर्मिती रसिकाच्या अर्थपूर्ण प्रतिसादाशिवाय पूर्ण होत नाही.' कसे ते लिहा.

**2.** अर्वाचीन साहित्य निर्मितीला प्रसार माध्यमे कशी साह्यभूत होतात ? विवेचन करा.

**किंवा**

साहित्याचा सूवर्णकाळ कशाकशावर अवलंबून असतो ?

**3.** रसनिर्मिती प्रक्रिया व साहित्यनिर्मिती प्रक्रिया यातील साम्यभेद स्पष्ट करा.

**किंवा**

साठोत्तरी मराठी साहित्य काळाच्या गरजांनुसार कसे निर्माण झाले आहे ? साधार लिहा.

**4.** साहित्य निर्मिती संबंधीचे प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचे विचार स्पष्ट करा.

**किंवा**

ललित लेखनाची वैशिष्ट्ये सांगून तुम्ही केलेल्या ललित लेखनासंबंधीचे अनुभव विशद करा.

**5.** टिपा द्या (फक्त **दोन**) :

(1) साहित्यकांचे माहे : एक समस्या

(2) राजशेखराची काव्यमीमांसा : एक आकलन

(3) साहित्याची भाषा

(4) तुम्ही केलेल्या प्रकल्पाचा अहवाल.